नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १४५ | Issue - 145 | वार - मंगळवार दि. २० ऑक्टोबर २०२६ | Blow- Tuesday Date 20 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान

### १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात; २ हजार ४१९ मतदान केंद्रांवर व्यवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या महाराष्ट्रामध्ये विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदानाची जोरदार चर्चा सुरू आहे. या निवडणुकीमुळे संपूर्ण राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. ही, महाराष्ट्र विधान परिषदेची अटीतटीची आणि बहुचर्चित औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागातील तीन पदवीधर सोबतच अमरावती आणि पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठीची मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. पाच मतदार संघामध्ये होणाऱ्या ह्या निवडणूकीमध्ये एकूण १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठीची निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे (शिक्षक आणि पदवीधर), नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्यामुळेभारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे. २३ ऑक्टोबरला निवडणूक झाल्यानंतर मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

**पाच जागांसाठी १८२ उमेदवार रिंगणात**



औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तर, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक उमेदवार असून, या पाचही मतदारसंघांत मिळून १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदार ठरविणार आहेत.

पाचही मतदारसंघांमध्ये एकूण १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद आहे. यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत. मतदानासाठी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सर्व मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

**६ डिसेंबरला विद्यमान सदस्यांची मुदत संपणार**

विधान परिषदेच्या ज्या पाच जागांसाठी ही निवडणूक होत आहे, त्या जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी पूर्ण होत आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर यांचा समावेश आहे.

## टायगरवर हल्ला करणारे तिघे जेरबंद; राजस्थानातील कोटा येथून अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुंबईतील जुहू परिसरात रविवारी सायंकाळच्या सुमारास अभिनेता टायगर श्रॉफसोबत भयंकर घडलं. त्याच्या चारचाकीवर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. टायगर श्रॉफ फुटबॉल मैदानात होता. फुटबॉल मैदानातून बाहेर पडत असताना, त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. या गोळीबारात दोन जण जखमी असल्याची माहिती आहे. सुदैवाने या हल्ल्यात टायगर श्रॉफला गंभीर दुखापत झालेली नाही. चारचाकीची काच फुटल्याने टायगर श्रॉफ जखमी झाला असल्याची माहिती आहे. टायगरचा कारचालक आणि आणखी एक व्यक्ती जखमी झाला असल्याची माहिती आहे. दरम्यान, या प्रकरणानंतर बॉलिवूडमध्ये खळबळ उडाली. लॉरेन्स बिश्नोईने या प्रकरणाची जबाबदारी घेतली आहे. अनिल पंडित याने पोस्ट शेअर करुन हल्ल्याची जबाबदारी घेतली आणि अभिनेता सलमान खानला इशारा दिला.

दरम्यान, टायगर श्रॉफ हल्ला प्रकरणात टायगर श्रॉफची आई आयेशा श्रॉफ यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. इंडिया टुडेशी बोलताना त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सध्या टायगर श्रॉफ यांच्या आईची प्रतिक्रिया चर्चेत आहे. टायगर श्रॉफच्या प्रतिकृती विषयी त्याच्या आईंकडे विचारपूस करण्यात आली. तेव्हा आयेशा श्रॉफ यांनी थंब्स अप केलं. तसेच गॉड इज ग्रेट असं म्हटलं. (ईश्वर महान आहे), अशी त्यांनी प्रतिक्रिया दिली. टायगर श्रॉफची आई आयेशा श्रॉफ आधी, टायगर श्रॉफचे वडील आणि अभिनेते जॅकी श्रॉफ यांची प्रतिक्रिया समोर आली होती. त्यांनी लेकाची तब्येत ठीक असल्याचं सांगितलं.

जॅकी श्रॉफच्या टीमने सांगितले की, 'टायगर आता ठीक आहे. तुमचे खूप खूप आभार'. सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांनी टायगर श्रॉफ यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणानंतर दिशा पटानीनेही अभिनेत्याची भेट घेतली. दिशा पटानीच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती. दिशा प्रचंड अस्वस्थ वाटत होती. अभिनेत्रीने टायगर श्रॉफच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली. तिचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला. दरम्यान, या प्रकरणाच्या संबंधित तीन आरोपींना राजस्थानमधील कोटा पोलिसांनी पकडले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गोळीबार करुन राजस्थानच्या दिशेनं पसार झाले होते. आरोपींचा नेपाळमध्ये जाण्याचा प्लान होता. राजस्थानच्या कोटा शहरातून कोटा पोलिसांनी अटक केली.

## १३ राज्यांना पावसाचा इशारा! आयएमडीचा अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मान्सूनचा परतीचा प्रवास अंतिम टप्प्यात असतानाच देशातील हवामानात मोठी उलथापालथ झाली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या आणि धक्कादायक इशाऱ्यानुसार, देशातील तब्बल १३ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, भयानक वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह महासंकटाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या तीव्र हवामान बदलामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी आणि प्रवाशांच्या चिंतेत मोठी भर पडली असून प्रशासनाकडून विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**महासंकट अटळ! १३ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा**



भारतीय हवामान खात्याच्या नवीन अंदाजानुसार, मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या १३ राज्यांत पावसाचे सावट आहे. काही भागांत ताशी ८० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वादळी वारे वाहण्याची शक्यता असून, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, सिक्कीम आणि आसाममध्येही मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी गारपिटीचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

राजधानी दिल्लीमध्ये २० ऑक्टोबर रोजी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा जोर राहून वाऱ्यांचा वेग ताशी २० ते ३० किमी राहू शकतो. येथील कमाल तापमान ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १९ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, राजस्थान या भागांत पाऊस व विजा पडण्याचा धोका वाढला आहे. उघड्या मैदानात किंवा झाडांखाली थांबणे टाळण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीर या डोंगराळ भागांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

उंचावरील भागांत भूस्खलन होण्यासोबतच काही ठिकाणी रस्ते बंद पडण्याची आणि हिमवृष्टीची शक्यता आहे. यामुळे प्रवाशांनी अतिशय काळजी घेण्याचे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दक्षिण-पश्चिम बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाल्यामुळे या हवामान बदलाचा थेट परिणाम शेतीवर झाला आहे. शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान टाळण्यासाठी हवामानाचा अंदाज घेऊनच शेतीची कामे करावीत. तसेच, समुद्रातील धोकादायक परिस्थितीमुळे मच्छीमारांना किनारपट्टीपासून दूर राहण्याचा आणि समुद्रात न जाण्याचा स्पष्ट सल्ला देण्यात आला आहे.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सक्तीची कर्जवसुली थांबवा; कर्जाचे पुनर्गठन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शासनाच्या निर्देशानुसार सक्तीची कर्जवसुली थांबवावी आणि कर्जाचे पुनर्गठन करावे, अशा सक्त सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या. सक्तीने किंवा जप्तीद्वारे कर्जवसुली केल्याचे आढळल्यास संबंधितांवर अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्ह्यात कार्यरत असलेल्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ, मायक्रो फायनान्स कंपनी नेटवर्क, पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष देवेंद्र शहापूरकर तसेच जिल्ह्यात कार्यरत असलेल्या विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दुष्काळामुळे नागरिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीत कर्जदारांना दिलासा देण्यासाठी मायक्रो फायनान्स कंपन्यांनी संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे. शासनाच्या निर्देशांचे पालन करून कर्जदारांकडून सक्तीची वसुली करू नये तसेच पात्र कर्जदारांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. कर्जाची परतफेड करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना कर्जफेडीचे महत्त्व समजावून सांगावे. नियमित कर्जफेडीमुळे आर्थिक शिस्त निर्माण होऊन भविष्यात आर्थिक उन्नती साधण्यास मदत होते, याबाबत ग्राहकांना योग्य मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले.

### बुधवारी अंक नाही

आज मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी विजयादशमी निमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या बुधवार २१ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक



## संपादकीय....

### प्रश्न टंचाईचा

अल निनोमुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये परतीच्या पाऊसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकरी राजा निराश झाला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर चाऱ्याचे भाव वाढले आहेत. भिवंडीतील गोठ्यांमधून विकल्या जाणाऱ्या दुधाचा भाव जवळपास १०० रुपये प्रति लिटरवर पोहोचला आहे. सणासुदीच्या काळात मागणी वाढल्याने सामान्य नागरिकांचं महिन्याचं बजेट कोलमडलं आहे. ग्राहकांना वाढत्या महागाईमुळे एका लीटर दुधासाठी मोठ्या प्रमाणावर किंमत मोजावी लागत आहे. गोठा चालकांचं असं म्हणणं आहे की, जनावरांचे खाद्य, चारा आणि पशु-धनासह अनेक गोष्टींचे भाव वाढले आहे, त्यामुळे आमचा नफा देखील कमी झाला आहे. ज्यामुळे दूध उत्पादन टिकवून ठेवणे अधिकाधिक कठीण होत आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये सामान्य नागरिकांचं महिन्या काठी असणारं बजेट कोलमडण्याची शक्यता आहे. ज्यांच्या घरी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पौष्टिक आहाराची गरज असलेल्या लोकांच्या घरी दूधाची मागणी मोठ्या प्रमाणावर असते. त्यांना यासाठी मोठा बसण्याची शक्यता आहे. सणासुदीच्या काळात दुधाचा वापर आणि वाढत्या मागणीमुळे दुकानांमध्ये दुधाचा तुटवडा भासण्याची शक्यता आहे. भुसा, म्हणजेच सुक्या चाऱ्याचा भाव ९५० ते ९६० रुपयांवरून १३७० रुपयांपर्यंत गेली आहे. भाताचा पेंढा, जो पूर्वी ७ ते ८ रुपये प्रति किलो दराने उप-लब्ध होता, तो आता २४ रुपये प्रति किलोवर पोहोचल्याचे वृत्त आहे. गवताचे भाव २२ ते २३ रुपयांवरून ३० रुपये प्रति किलोपर्यंत वाढले आहेत, तर भुसा आणि पशुखाद्याच्या मिश्रणाचे भाव ३८ ते ४० रुपयांवरून ५० रुपये प्रति किलोच्या पुढे गेले आहेत. ज्वारी आणि बाजरीच्या काड्यांचा भुसा, जो पूर्वी १५ ते १६ रुपये प्रति किलो दराने मिळत होता, तो आता २० रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. महाराष्ट्रातील दुष्काळाचा फटका आता केवळ शेती आणि पिकांपुरता मर्यादित राहिलेला नाही. सामान्य नागरिकाच्या खिशाला सुद्धा आता दुष्काळाची झळ बसू लागलेली आहे.

नवरात्र महोत्सवः नववी माळ

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री. दुर्गा देवीमाता पोशाख सह अलंकार परिधान

## परिवार देवतांनाही पारंपरिक पोशाख व अलंकारांनी सजविले, विजयादशमी आणि एकादशीच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांचे नियोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने घटस्थापनेपासून सुरू असलेल्या नवरात्र महोत्सवानिमित्त नवव्या माळेला श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींना प्रथा-परंपरेनुसार विविध सुवर्णालंकार परिधान करण्यात आले. यावेळी श्री रुक्मिणी मातेस पारंपरिक श्री दुर्गादेवीम तेचा पोशाख परिधान करण्यात आला. देवतांचे मनोहारी व भक्तिमय स्वरूप पाहण्यासाठी भाविकांमध्ये उत्साहा-चे वातावरण असल्याचे याबाबतची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड, शिरपंच मोठा, शिरपेत लहान, मोत्याचा तुरा, तुळशीची माळ एक पदरी, लॉकेट पाच पदरी, लहान चंद्रहार, लॉकेट नऊ पदरी, लॉकेट पट्टीचे, अष्टपैलू मण्याची कंठी, मोहनमाळ, अष्टपैलू कंठी पदकासह, लॉकेट बदामासह, तोडे जोड, लॉकेट चार पदरी, मत्स्य जोड, सोने पितांबर इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

तसेच ✻रुक्मिणी मातेस जडावाचा मुकुट, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, बाजूबंद जोड,खड्यांची वेणी, पाचूची घरचोळी, चिंचपेटी पांढरी, हातसर जोड, पानाड्याचा हार, तन्मणी मोठा, मद्रासी कंठा,मास पट्टा, शिंदेहार, जडावाचे ताणवट जोड, चंद्र,सूर्य, मोत्याचा कंठा, बाजीराव गरसोळी, पेठयांची बिंदी, खड्यांच्या पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसूत्र, मत्स्य जोड, पैंजणजोड, मोठी नथ, वाक्या जोड, सोन्याचा करंडा, वाक्याजोड, तोडे जोड, छत्रछामर इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

राधिका मातेस नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, लक्ष्मीहार, जवेची माळ, हायकोल, मोहरांची माळ इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

सत्यभामादेवीला सिद्धेश्वर मुकुट, पुतळ्यांची माळ, जवेची माळ, जवमणि पदक, चिंचपेटी हिरवी, इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी एक पदरी पाचूचा लोलक अस-लेली, एकदाणी, चंद्रहार पाच पदरी, चांदी छत्री, साखळ्या जोड, तुळशीची माळ इत्याधी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री. व्यंकटेशास नक्षी टोप प्रभावळीसह, पैंजणजोड, तांदळाहार, मोहनमाळ, सूर्यकल्यांचाहार, दंडपेट्या जोड, इमिटेशन नेकलेस, मोत्याची कंठी एक पदरी, हिऱ्याचा कंबरपट्टा इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अखत्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आलेले आहेत.

दि. २२ ऑक्टोबर गुरुवार रोजी एकादशी असल्याने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन दर्शनरांगेतील गर्दीचे नियोजन, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, पिण्याच्या पाण्याची व चहावाटपाची व्यवस्था, आवश्यक ठिकाणी बॅरिकेडिंग, विद्युत व्यवस्था आणि इतर अनुषंगिक सोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

भाविकांना सुरक्षित, सुलभ व सुव्यवस्थित दर्शन घेता यावे, यासाठी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून, उत्सवकाळात भाविकांच्या सोयी-सुविधांना प्राधान्य देण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.






# सोलापूर जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून खत खरेदी-विक्रीसाठी क्यूआर कोड बंधनकारक

**शेतकऱ्यांचा फार्मर आयडी किंवा आधार क्रमांक आवश्यक; नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : रब्बी हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर सोला-पूर जिल्ह्यातील खत वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र शासनाच्या खत विक्रीसाठीच्या नवीन एफएफएस प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यानुसार २२ ऑक्टोबर २०२६ पासून जिल्ह्या-तील सर्व खत विक्रेत्यांना क्यूआर कोडच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा फार्मर आयडी किंवा आधार क्रमांक वापरूनच खतांची खरेदी-विक्री करणे बंधनकारक राहणार आहे. या प्रणा-लीची सर्व खत विक्रेते व वितरकांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

रब्बी हंगाम २०२६-२७ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, कृषी विकास अधिकारी हरी हावळे, मोहिम अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी (सामान्य), खत कंपन्यांचे जिल्हा व्यवस्थापक तसेच सर्व संबंधित पुरवठादार उपस्थित होते.



२२ ऑक्टोबरपासून नवीन प्रणा-लीची अंमलबजावणी

केंद्र शासनाने खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता, साठ्याचे योग्य व्यवस्थापन आणि खत विक्रीची नोंद अधिक प्रभावी करण्यासाठी एफएफएस प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीअंतर्गत क्यूआर कोडचा वापर करून शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी किंवा आधार क्रमांकाच्या आधारे खत विक्रीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व खत विक्रेते, वितरक आणि संबंधित खत कंपन्यांच्या प्रतिनिधींनी शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक तयारी करून प्रणालीची अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

खत साठा आणि विक्रीतील तफावत आढळल्यास कारवाई

दि. १९ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत खत विक्रेत्यांनी प्रत्यक्ष उपलब्ध साठा आणि पॉइंट ऑफ सेल (पीओएस) प्रणालीतील नोंदी यामध्ये कोणतीही तफावत रा-हणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रत्यक्ष विक्रीच्या तुलनेत पीओएस प्रणालीतील साठा कमी दाखविणे किंवा प्रत्यक्ष साठ्याची चुकीची नोंद करणे असे प्रकार आढळल्यास संबंधित कृषी सेवा केंद्रधारकांविरुद्ध खत नियंत्रण आदेश, १९८५ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला.

एफएफएस पबाबत गावपातळीवर जनजागृती व प्रशिक्षण

एफएफएस पच्या वापराबाबत शेतकऱ्यांना माहिती मिळावी आणि नवीन प्रणालीचा वापर सुलभ व्हावा, यासाठी कृषी विभागातील सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी, खत पुरवठादार कंपन्यांचे जिल्हा प्रतिनिधी आणि कृषी सेवा केंद्रधारक यांनी समन्वयाने काम करावे. गावपातळीवर शेतकऱ्यांना या प्रणालीची माहिती देणे, प्रचार-प्रसिद्धी करणे, आवश्यक मार्गदर्शन करणे तसेच पची कार्यप्रणाली समजावून सांगण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. नवीन प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी खत विक्रेते, वितरक आणि संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करून शेतकऱ्यांना खत खरेदीच्या प्रक्रियेत अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही देण्यात आले.

**शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक**

**धार्मिक परंपरा, शिवविचार आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी नवरात्रोत्सवाला रंगत**

# सैनिक टाकळी येथे दुर्गामाता दौडीचा भक्तिमय जल्लोष!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/संजय चव्हाण : सैनिक टाकळी : भक्तीचा जागर, दुर्गामातेचा जयघोष, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा आणि पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साह अशा मंगलमय वातावरणात सैनिक टाकळी येथे दुर्गामाता दौड व नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या दुर्गामाता दौडीमुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साह-पूर्ण वातावरण निर्माण झाले असून, मंडळाच्या या उपक्रमाचे नागरिक आणि भाविकांकडून कौतुक केले जात आहे.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो श्रद्धा, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. याच भाव-नेतून शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या वतीने दुर्गामाता दौड आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमातून तरुणाईमध्ये धार्मिक संस्कार रुजविण्यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, स्वराज्याची प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पहाटेच्या आरतीने दुर्गामाता दौडीला सुरुवात

रविवारी पहाटे संभाजीनगर येथून दुर्गामातेची आरती करून दौडीला सुरुवात करण्यात आली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात दुर्गामातेच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. या दौडीत भाविक, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ठिकठिकाणी भाविकांनी दुर्गामातेचे स्वागत करून दर्शन घेतले. श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी झालेल्या भाविकांमुळे दौडीला विशेष रंगत आली.

दुर्गामाता दौड ही केवळ धार्मिक परंपरा न राहता समाजात एकजूट, शिस्त, संस्कार आणि सकारात्मक विचार रुजविणारे माध्यम ठरत आहे. तरुणांनी एकत्र येऊन धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा, आपल्या परंपरांचे जतन करावे आणि इतिहासातील प्रेरणादायी विचार आत्मसात करावेत, हा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

**शिवजागृती गीतांनी जागविला स्वराज्याचा अभिमान**

दौडीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याच्या कार्याची आठवण करून देणारी शिवजागृती गीते सादर करण्यात आली. या गीतांमुळे उप-स्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिवरायांचे शौर्य, त्यांची दूरदृष्टी, स्वराज्यनिष्ठा आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांची आठवण करून देणाऱ्या गीतांनी तरुणाईमध्ये इतिहासाविषयी अभिमान जागविण्याचे काम केले.

धार्मिक श्रद्धेसोबतच ऐतिहासिक वारशाची जपणूक करणारा हा उपक्रम सैनिक टाकळीच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण ठरत आहे. शिवरायांचे विचार केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न राहता त्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताचे कार्य करण्याची भावना अशा उपक्रमांमधून दृढ होत आहे.

राजमाता जिजाऊ लेझीम मंडळाची विशेष रंगत

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ लेझीम मंडळाच्या वतीने विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. लेझीमच्या तालावर सादर होणारी प्रात्यक्षिके, पारंपरिक खेळ आणि सांस्कृतिक सादरीकरणांमुळे उत्सवात चैतन्य निर्माण होत आहे.

महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा महत्त्वाचा भाग असलेल्या लेझीममुळे शिस्त, संघभावना आणि शारीरिक चपळतेचे दर्शन घडते. पारंपरिक कलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे.

लाठी-काठी आणि पारंपरिक खेळांतून शौर्याचे दर्शन

नवरात्रोत्सवादरम्यान लाठी-काठी आणि पारंपरिक खेळांचे आयोजनही करण्यात येते. या खेळांमधून महाराष्ट्राच्या पारंपरिक युद्धकलेची आणि शारीरिक कौशल्यांची ओळख होते. पारंपरिक खेळांचे जतन व्हावे, तरुणांमध्ये शिस्त आणि आत्मविश्वास वाढावा तसेच आपल्या सांस्कृतिक वारशाविषयी अभिमान निर्माण व्हावा, या दृष्टीने या उपक्रमांकडे पाहिले जात आहे.

धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा पारंपरिक कलांना स्थान दिल्यामुळे नवरात्रोत्सव अधिक वैविध्यपूर्ण बनत आहे.

**दांडियाच्या तालावर रंगणार नवरात्रोत्सव**

नवरात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या दांडिया कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे. दांडिया ग्रुपच्या माध्यमातून नऊ दिवस विविध कार्यक्रम साजरे केले जात आहेत. पारंपरिक वेशभूषा, संगीताचा ताल आणि दांडियाच्या उत्साहामुळे उत्सवाला सांस्कृतिक रंगत प्राप्त होत आहे.

महिला, युवक आणि नागरिकांना एकत्र आणणारे हे कार्यक्रम सामाजिक सलोखा वाढविण्यास मदत करतात. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सर्वांनी एकत्र येऊन आनंद साजरा करावा आणि आपापसातील स्नेहबंध अधिक दृढ करावेत, अशी भावना या कार्यक्रमांतून व्यक्त होत आहे.

**महिलांसाठी 'होम मिनिस्टर'सह विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम**

नवरात्रोत्सव केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता नागरिकांच्या मनोरंजनासाठीही विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये महिलांसाठी 'होम मिनिस्टर'सारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे नऊ दिवसांच्या उत्सवात उत्साह टिकून राहतो.

महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि समाजातील सर्व घटकांना उत्सवात सहभागी करून घेणे, या दृष्टीने अशा कार्यक्रमांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

अध्यक्ष अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे नियोजन

शिवाजी तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे सर्व सदस्य दुर्गामाता दौड आणि नवरात्रोत्सवाच्या विविध कार्यक्रमांसाठी परिश्रम घेत आहेत. धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजन आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी मंडळाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

संभाजीनगरमधील नागरिक, भाविक आणि युवकांनी दुर्गामाता दौडीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**भक्ती, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम**

सैनिक टाकळी येथील दुर्गामाता दौड आणि नवरात्रोत्सवातून धार्मिक श्रद्धा, महाराष्ट्राची परंपरा, शिवरायांचे विचार आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम पाहायला मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे गावातील नागरिकांना एकत्र येण्याची संधी मिळते, युवकांना विधायक कार्याची प्रेरणा मिळते आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची भावना अधिक दृढ होते.

दुर्गामातेच्या भक्तीचा जागर करताना शिवरायांच्या विचारांची प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपणारा सैनिक टाकळीचा नवरात्रोत्सव नागरिकांसाठी उत्साह, श्रद्धा आणि एकात्मतेची पर्वणी ठरत आहे. शिवाजी तरुण मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

**– संजय चव्हाण, प्रतिनिधी**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# घाटणे बॅरेज बाधित शेतजमिनींची आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे फेरमोजणी करा

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे पाटबंधारे विभागाला निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत घाटणे बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या भोयरे, घाटणे आणि दाईगडेवाडी येथील शेतजमिनींची आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फेरमोजणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच नरखेड व खरकटणे येथील शेतजमिनींच्या संपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

घाटणे बॅरेजमुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध अडचणींबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या भोयरे, घाटणे, दाईगडेवाडी, मलिकपेठ, नरखेड आणि खरकटणे या गावांतील शेतजमिनींच्या फेरमोजणीसह भूसंपादनाच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भूसंपादनाच्या सीमा आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने निश्चित करून भोयरे, घाटणे आणि दाईगडेवाडी या गावांतील जमिनींची फेरमोजणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी




कार्तिकेयन यांनी दिले. नरखेड व खरकटणे येथील बाधित शेतजमिनींची करण्यात आलेली मोजणी शेतकऱ्यांना मान्य असल्याने, त्यानुसार पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करून जमिनी खरेदीची प्रक्रिया सुरू करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्थानिक शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही

घाटणे बॅरेजमधून स्थानिक शेतकऱ्यांना वापरासाठी पाणी उपलब्ध करून देणे तसेच कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातून धाराशिव जिल्ह्याला पाणी देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. हे दोन्ही विषय धोरणात्मक स्वरूपाचे असल्याने शासनस्तरावर आवश्यक त्या परवानग्या घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. दरम्यान, बॅरेजच्या खालच्या बाजूस पाण्याच्या प्रवाहामुळे खरडून गेलेल्या जमिनींच्या भूसंपादनाचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. या जमिनींचे संपादन करण्यासाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सोलापूर पाटबंधारे विभागाला देण्यात आल्या. बैठकीस उपजिल्हाधिकारी डॉ. सीमा होळकर, धाराशिव पाटबंधारे मंडळाचे कार्यकारी अभियंता अमोल नाईक, सोलापूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता पवार, मोहोळचे तहसीलदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख, मोहोळ तसेच घाटणे बॅरेज परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते.

## पंढरपुरात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ बैठक



**मुख्याध्यापक महामंडळाचे माझी अध्यक्ष सुभाष माने यांच्या पाठिंबामुळे भाजप उमेदवार विजयी होण्याची संकेत!**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाचे भाजपअधिकृत उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे व पुणे विभागीय पदवीधर मतदार संघाच्या भाजपचे अधिकृत उमेदवार डॉ. सौ स्मिताताई योगेश जाधव यांच्या प्रचारार्थ सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पांडुरंग परिवार व परिचारक समर्थक पंढरपूर तालुक्यातील शिक्षक व संस्थाचालक पदवीधर व मुख्याध्यापक सह विचारी सभा सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली मार्केट कमिटी सभागृहामध्ये पार पडली.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे निरीक्षक व माजी आमदार कुंदन पाटील, मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. सुभाष माने, पंढरपूर तालुक्याचे माजी सभापती अँड वामनराव माने, मार्केट कमिटीचे सभापती हरीश दादा गायकवाड, व्हाईट चेअरमन राजू बापू गावडे, पांडुरंग परिवारातील सदस्य व परिचारक प्रेमी मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.

भाजप महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना पसंती क्रमांक एकचे मत देऊन प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला कृषी उत्पन्न बाजार समिती येथील सभेनंतर सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या संपर्क कार्यालयात काळे शिक्षक समर्थक व पदवीधरांचा मेळावा पार पडला यावेळी चेअरमन कल्याणराव काळे व्हॉइस चेअरमन मोहन नागटिळक, माझी व्हाईस चेअरमन भारत कोळेकर यांच्यासह काळे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिम प्रतिष्ठानतर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ७० पुस्तकांचे वाटप; विद्यार्थ्यांना गोड खाऊची मेजवानी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भीम प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या वतीने रावजी सखाराम हायस्कूल, सोलापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र व विचारधन या पुस्तकांचे वाटप तसेच शालेय विद्यार्थ्यांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याची व विचारांची प्रेरणा निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून




अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मंगळवेढा येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव पवार, प्रसिद्ध उद्योगपती राजेंद्र शहा कासवा आणि पदमचंद राका उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व विशद केले तसेच उपस्थितांना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र व विचारधन या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रशालेतील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गोड खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला चंद्रकांत तमशेट्टी, मारुती खानापुरे, भीम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दलितमित्र बाबा बाबरे, सचिव अकबर शेख, उपाध्यक्ष ड. विशाल मस्के, रावजी सखाराम हायस्कूलचे मुख्याध्यापक भरत केत सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सर्वगोड मॅडम आणि कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रावजी सखाराम हायस्कूलमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह भीम प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन गोरे सर यांनी केले, तर रमेश वडाराव सर यांनी आभार प्रदर्शन केले.

ज्ञानदानातून प्रबोधन आणि सेवेतून सामाजिक बांधिलकी जपत भीम प्रतिष्ठानने धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला.

## निफाड शहरातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथ संचलन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातून सालाबाद प्रमाणे यावर्षी विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शिस्तबद्ध घोषपथका सह संचलन संपन्न झाले.



याप्रसंगी विजयादशमी उत्सव प्रसंगी संघचालक विष्णुदास भावसार व स्वयंसेवक उपस्थित होते.

शंतनू पाटील यांनी विजयादशमीचे हिंदू धर्मातील महत्त्व, रामायण व महाभारतातील विजयादशमी चे महत्व

तसेच हिंदू धर्माच्या दृष्टीने शस्त्र पूजनाचे महत्व समजून सांगितले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करताना स्वयंसेवक कसा असावा, स्वयंसेवकाची शिस्त, जीवन जगण्याची पद्धती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कार्यपद्धती संघ स्थापनेपासून आजपर्यंत संघाने समाजासाठी, वंचितांसाठी, तरुणांसाठी, पर्यावरणासाठी, देशासाठी वेळोवेळी केलेले कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली.असुन पंच परिवर्तन याविषयी सविस्तर माहिती दिली.

पंचपरिवर्तनामध्ये कुटुंब प्रबोधन, एकत्रित कुटुंबाचे महत्त्व, कुटुंब व्यवस्थेचे भारतीय समाजातील स्थान,

पर्यावरण

पर्यावरणाला त्रास होऊ नये याकरिता स्वयंसेवकाने स्वतः जीवन जगताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे, प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर न करणे, साधी राहणीमान, पाण्याचा जपून वापर करणे, यावेळी वृक्ष लागवड करणे, पर्यावरणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींना आणि संस्थांना मदत करणे या प्रकारचे काम स्वयंसेवक करतात.

नागरी शिष्टाचार

दैनंदिन जीवन जगत असताना स्थानिक संस्थांच्या नियमांचे व कायद्याचे पालन करणे, व्यसन न करणे, सर्व स्वयंसेवकांनी संघटित राहणे.

सामाजिक समरसता

स्वयंसेवकांनी जातिभेद पाळणे, या देशांमध्ये राहणारे, देशासाठी त्याग करणारे, देशभक्ती बाळगणारे सर्व हिंदूच आहेत ही भावना महत्त्वाची.

आपल्या दैनंदिन जीवनात तसेच कुटुंबाच्या पानांपासून करताना जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा अंगीकार करावा, याविषयी उद्बोधन केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.

## येडोळा येथील धम्म बांधव नागपूर दीक्षाभूमीकडे रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मक्रांती भूमीकडे म्हणजे नागपूर येथील दीक्षाभूमीला नतमस्तक होण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथील सिद्धार्थ कला व क्रीडा मंडळ तथा सिद्धार्थ बुद्ध विहार मंडळाचे सन्माननीय सदस्य बौद्ध बांधव,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे यडोळा शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, तुळजापूर तालुका संघटक सुरेश लोंढे,तालुका उपाध्यक्ष रामचंद्र लोंढे,जेष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय काबळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नागपूर दीक्षाभूमी कडे रवाना झाले आहेत.

भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.१४ऑक्टोबर १९५६ रोजी अशोक विजयादशमीचे ( दसरा) औचित्य साधून नागपूर येथील दीक्षाभूमीवर हिंदु धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला.

या ऐतिहासिक धम्मक्रांती दिनाला आज ७०वर्षे पूर्ण होत आहेत.अशोक विजय दशमी हा दिवस सर्वत्र धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून



साजरा केला जातो.या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने देशभरातील लाखो बांधव नागपूर येथिल ऐतिहासिक दीक्षाभूमीवर नतमस्तक होण्यासाठी येतात त्याचाच भाग म्हणून येडोळा येथील बौद्ध उपासक उपासिका नागपूर येथील दीक्षाभूमीला नतमस्तक होण्यासाठी दि.१९ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजल्या दरम्यान नळदुर्ग येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकातून नागपूरकडे रवाना झाले आहेत.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) धाराशिव जिल्हा सचिव एस.के. गायकवाड रा.वागदरी ता.तुळजापूर यांनी त्यांच्या या प्रवासाला शुभेच्छा दिल्या आहेत.

अशोक.विजयादशमी (दसरा) दिनी अर्थात धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या ७० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आम्हाला नागपूर येथील दीक्षाभूमीला नतमस्तक होण्याचा योग येत असून त्याबद्दल आम्हाला फार मोठे समाधान वाटत आहे.अशा पद्धतीच्या भावना या दौऱ्यातीलं बौद्ध बांधवांनी आपाल्या दौऱ्याला सुरुवात करण्यापूर्वी व्यक्त केल्या असून या दौऱ्यात दत्तात्रय कांबळे, रामचंद्र लोंढे,सुरेश लोंढे, देवानंद लोंढे,अर्जुन लोंढे, जितेंद्र लोंढे, रतन लोंढे स्वप्नील लोंढे दीपक भांगे धम्म भगिनी दीक्षा लोंढे पायल लोंढे,रागिणी लोंढे सुजाता लोंढे,काजल गायकवाड आदींचा समावेश आहे.

**चार दुचाकींवरील सायलेन्सर काढून जप्त; वाहनधारकांकडून ४ हजारांचा दंड वसूल**

**मोठ्या आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास रोखण्यासाठी पोलिसांची धडक कारवाई; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कारवाईचा इशारा**

# मॉडिफाइड सायलेन्सर लावणाऱ्या दुचाकीस्वारांना लासलगाव पोलिसांचा दणका!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दुचाकींना मॉडिफाइड सायलेन्सर बसवून कर्णकर्कश आवाजात वाहने चालविणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध लासलगाव पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून. शहरात मोठ्या आवाजात वाहने चालवून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या वाहनधारकांवर पोलिसांनी धडक कारवाई करत चार दुचाकींवरील मॉडिफाइड सायलेन्सर काढून जप्त केले आहेत. तसेच संबंधित वाहनधारकांकडून एकूण चार हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला पोलिसांच्या या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकीस्वारांचे धाबे दणाणले असून, बेकायदेशीर बदल केलेल्या वाहनांविरुद्ध कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

**मॉडिफाइड सायलेन्सरमुळे ध्वनिप्रदूषणात वाढ**

लासलगाव शहरात काही दुचाकीस्वार आपल्या वाहनांना मॉडिफाइड सायलेन्सर बसवून मोठ्या आवाजात वाहने चालवत असल्याचे निदर्शनास आले होते. अशा सायलेन्सरमधून निघणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, ध्वनिप्रदूषणाची समस्याही निर्माण होत आहे. विशेषतः बाजारपेठ, वर्दळीचे रस्ते आणि नागरी वस्तीच्या परिसरात मोठ्या आवाजात वाहने चालविल्याने नागरिकांची शांतता भंग होण्याची शक्यता असते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. डी. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती विमला एम. तसेच निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या आदेशान्वये मॉडिफाइड सायलेन्सर वापरणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध ही मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत एएसआय पैठणकर आणि पोलीस शिपाई शिंदे यांनी सहभाग घेतला..

**नियम पाळा; अन्यथा कारवाईला सामोरे जा!**

वाहन चालविताना वाहतुकीचे नियम पाळणे ही प्रत्येक वाहनधारकाची जबाबदारी आहे. वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसविणे आणि नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने वाहने चालविणे टाळावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे मॉडिफाइड सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनधारकांना स्पष्ट संदेश मिळाला असून, नागरिकांना त्रासदायक ठरणाऱ्या कर्णकर्कश आवाजाला आळा घालण्यासाठी अशा मोहिमा महत्त्वपूर्ण ठरणार आहेत असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# बुद्ध तत्त्वज्ञानाची ताकद बाबासाहेबांच्या विचाराने डोक्यात रुजवा

## आ. राजकुमार बडोले यांचे प्रतिपादन; खांबीत समाजप्रबोधन, धम्मचक्र अनुवर्तन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/गोंदिया : बौद्ध धम्म हा जगातील शांतताप्रिय धम्म असून, भगवान गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानात समाजपरिवर्तनाची मोठी ताकद आहे. तथागत बुद्धांनी शस्त्रायेवजी पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि शांततेच्या विचारांतून जगाला मानवतेचा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माचा सखोल अभ्यास करून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देत समाजाला सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखविला. बाबासाहेबांच्या नावाचा जयघोष करण्यासोबतच



त्यांचे विचार आचरणात आणणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार इंजि. राजकुमार बडोले यांनी केले.

अर्जुनी-मोर तालुक्यातील खांबी येथे ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त (१८ ऑक्टोबर) रोजी आयोजित समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर होते. यावेळी विशेष मार्गदर्शक म्हणून माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे उपस्थित होते. तसेच पंचायत समितीचे उपस्भापती संदीप कापगते, राजहंस ढोक, सरपंच अथिनी लोणारे, दिलवर रामटेके, मुन्ना देशपांडे, शुभम हुमणे, पत्रकार सुरेंद्रकुमार ठवरे, पोलीस पाटील नेमीचंद मेशाम, ब्राहाणकर सर, पुरुषोत्तम डेसे आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनांचे महत्त्व अधोरेखित केले. भगवान बुद्धांचा समता, बंधुता, करुणा आणि मानवतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. समाजाने शिक्षणाला प्राधान्य देऊन सामाजिक एकोपा मजबूत करावा आणि महापुरुषांच्या विचारानुसार आचरण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनीही यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बावासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या संदेशाचे महत्त्व विशद केले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी वैचारिक जागृती, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी आवश्याल असल्याचे त्यांनी सांगीतले. बुद्धांच्या मानवतावादी विचारांचा स्वीकार करून समाजाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

धम्मचक्र अनुवर्तन दिनाच्या निमित्ताने आयोजित या समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमातून उपस्थितांना बुद्ध विचार, सामाजिक समता आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा संदेश देण्यात आला. संचालन व आभार गावकरी यांनी केले.

# विद्यार्थ्यांना संशोधक व शास्त्रज्ञ होण्यासाठी बीआरसी मुंबईच्या शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन




**न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, भाळवणी येथे विकिरण जनजागृती कार्यशाळा उत्साहात**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे Indian ssociation for Radiation Protection (IRP) यांच्या वतीने Public wareness Programme अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्रातील (BRC) शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना विकिरण, अणुविज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य के डी शिंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संशोधक सैदणे, पाटील, सरपंच रणजित जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, प्रशांत माळवदे, शिक्षक संजय शिंदे, विष्णुपंत लेंडवे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, संशोधनाविषयी आवड वाढविणे आणि विज्ञानातील विविध संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हा उद्देश होता. शास्त्रज्ञांनी विकिरण म्हणजे काय, त्याचे विविध प्रकार, विकिरणाची निर्मिती कशी होते, तसेच त्याचे विविध क्षेत्रांतील उपयोग याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील विकिरणाचे महत्त्व, रेडिएशन डिटेक्टर व रेडिएशन मॉनिटर यांसारख्या उपकरणांची कार्यपद्धती आणि विकिरणासंबंधी आवश्यक असलेली खबरदारी या विषयांवरही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये अणुसंशोधनाचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक करिअरचा विचार न करता अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्र, अणुविज्ञान, संशोधन आणि वैज्ञानिक क्षेत्रातील विविध करिअर संधींचा विचार करावा, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, चिकित्सक विचारसरणी आणि संशोधनाची आवड निर्माण होण्यास मदत होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शास्त्रज्ञांकडून विज्ञानविषयक माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना संशोधनाची दिशा मिळावी आणि भविष्यात त्यांनी संशोधक व शास्त्रज्ञ म्हणून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, या दृष्टीने ही कार्यशाळा उपयुक्त ठरली.

# कल्याणशेट्टी प्रशालेतील विद्यार्थ्यांची पुणे येथील विभागस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने पंढरपूर येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कुमार सिद्धाराम भोजण्णा जमादार हा विद्यार्थी १४ वर्षाखालील वयोगटातून १०० व २०० मीटर धावणे या दोन्ही स्पर्धेत जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवला असून आता त्याची विभागीय क्रीडा स्पर्धेत निवड झालेली आहे. त्याच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी कामगिरीबद्दल तालुक्यातील ग्रामीण भागातून कौतुक होत आहे. सिद्धाराम जमादार हा विद्यार्थी हसापूर सारख्या ग्रामीण भागातून आलेला अतिशय गरीब कुटुंबातील असून आई-वडिलांचे आशीर्वाद व क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन याबरोबरच रोज मैदानावर खेळणे, सातत्याने सराव करणे तसेच खेळाविषयी आवड, जिद्द, चिकाटी यामुळे तो यशस्वी झाल्याचे सांगितला.

यशस्वी विद्यार्थ्यास क्रीडाशिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगे या शिक्षकांनी



मार्गदर्शन केले आहे.

यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बँक व फायनान्स चे सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवा अन्यथा अक्कलकोट रिपाइं (आठवले गट)चे आंदोलन : अविनाश मडिखांबे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : सध्या महाराष्ट्रातील सर्वत्र दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आला आहे. या परिस्थितीत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला बचत गटातील सदस्य तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

अशा कठीण परिस्थितीत महिला बचत गट, मायक्रो फायनान्स कंपन्या तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवावी, अशी ठाम मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी तहसिलदार विनायक मगर यांच्याकडे केली आहे.

दुष्काळामुळे नागरिकांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागविणेही कठीण होत आहे. अशा वेळी कर्जवसुलीसाठी दबाव आणल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी आणखी वाढू शकतात. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन संबंधित बँका व मायक्रो फायनान्स कंपन्यांना आवश्यक निर्देश द्यावेत आणि कर्जदारांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात अक्कलकोटचे तहसीलदार श्री. विनायक मगर यांच्याकडे निवेदनाद्वारे सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी रिपाई जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, तालुका उपाध्यक्ष आंबादास गायकवाड, तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,दत्ता कांबळे,राजू कांबळे,ताहीर शेख,राजु हडपद, अर्जून बावकर, पुजा सनगुंदी,अजय कांबळे, निंगप्पा निंबाळ, शंकर बनसोडे आदी उपस्थित होते.

**तहसीलदार विनायक मगर यांना रिपाइं चे निवेदन**

दुष्काळग्रस्त नागरिकांना आर्थिक संकटातून दिलासा मिळावा, महिलांवरील कर्जवसुलीचा ताण कमी व्हावा आणि प्रशासनाने जनहिताच्या दृष्टीने तातडीने योग्य पावले उचलावीत, अशी भूमिका अविनाश मडिखांबे यांनी मांडली आहे.

दुष्काळाच्या संकटात सर्वसामान्य जनतेला दिलासा द्या; सक्तीच्या कर्जवसुलीला तात्काळ स्थगिती द्या!अन्यथा रिपाइं कडून आंदोलन छेडण्याचा ईशारा या वेळी मडिखांबे यांनी केली आहे.

**डॉ. बी.पी. रोंगे यांना पाचही जिल्ह्यात वाढता पाठिंबा**

# पुणे शिक्षक मतदार संघाचे निवडणूक रंगतदार होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : पुणे शिक्षक विधान परिषद निवडणुकीचा मतदार संघ व पदवीधर मतदारसंघाचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून निवडणुकीच्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भाजप महायुतीचे उमेदवार कौस्तुभ गावडे, अपक्ष उमेदवार तथा विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव डॉक्टर बी .पी .रोंगे विद्यमान आमदार जयंत आसगावकर माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यातील लढत दिवसेंदिवस रंगतदार होत आहे, विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव डॉक्टर बी. पी. रोंगे सर, शिक्षकाने विविध संघटनांकडून मिळालेला पाठिंबा यांना मिळालेल्या पाठिंबामुळे निवडणुकीचे समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पुणे शिक्षक मतदार संघाची निवडणूक २३ ऑक्टोबर रोजी होणार असल्याने उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. शेवटच्या टप्प्यात शिक्षकापर्यंत पोहोचण्याचा भर असून, शिक्षकांच्या प्रश्न व त्यांच्या मागण्यावरून प्रचारामध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत.

   

प्रचारादरम्यान डॉक्टर बी पी रोंगे यांनी विविध शैक्षणिक संस्था व शिक्षकांची प्रत्यक्ष संवाद यावर भर दिला आहे त्यामुळे शिक्षकांच्या अडीअडचणी जाणून घेणे, व त्यांच्या प्रश्नांना सोडवण्याचे आश्वासन देत त्यामुळे त्यांच्या प्रचारास प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विद्यानामदार जयवंत आजगावकर, माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या त्यांच्या कार्यपद्धतीवर काही शिक्षक संघटनांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. गेल्या बारा वर्षात शिक्षकाचे प्रश्न मार्गी लागले नाहीत असा आरोपी काही शिक्षक व शिक्षक संघटनांकडून केला जात आहे. या नाराजीचा फायदा डॉक्टर बीपी रोंगे सर यांना होऊ शकतो. अशी चर्चा निवडणूक प्रचारामध्ये रंगू लागले आहे.

शिक्षकांच्या वेतन सेवा संबंधित प्रश्न व अनुदान नियुक्त आणि शैक्षणिक संस्थेमधील अडचणी या विषयावर ठोस भूमिका घेण्याच्या प्रक्रियेवर अपेक्षा शिक्षकाकडून व्यक्त केल्या जात आहे. हे प्रश्न सोडवण्यासाठी डॉक्टर बी पी रोंगे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली आहे.

भाजप माहितीचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या वयाच्या विचाराची चर्चा, दुसरीकडे भाजप महायुतीचे उमेदवार वयाच्या मुद्द्यावरून चर्चा सुरू आहे. शिक्षक विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवाराची वय ३० वर्षे पूर्ण असणे आवश्यक असते श्री गावडे यांचे वय २९ वर्षे असल्याचा आरोप केला जात आहे. एका अपक्ष उमेदवार कडून केला जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे गावडे यांच्या उमेदवारीला राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. निवडणुकीस अवघे काही दिवस शिल्लक असताना. त्यामुळे त्यांच्या प्रचारावर काही परिणाम होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अंतिम टप्प्याच्या प्रचाराकडे लक्ष, शिक्षक उमेदवारांना अनेक संघटनेचा मिळणारा पाठिंबा व शिक्षकांचा वाढता पाठिंबा याचा निर्णय ठरणार आहे. भाजप माहितीची ताकद व विद्यमान माजी आमदार व आणि डॉक्टर बीपी रोंगे यांच्या भोवती तयार होत असलेली समर्थन त्यामुळे निवडणुकीमध्ये चुरस निर्माण झाली आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावर नाराजी व्यक्त करणारी मतदार पर्यायी नेतृत्वाला संधी देणार का? डॉक्टर बी पी रोंगे यांचा वाढता जनसंपर्क रूपांतरित होणार का व कौस्तुभ गावडे यांच्या वयाच्या अधिकृत स्पष्टीकरण समोर येणार का? हे प्रश्न सध्या चर्चेत आहेत. २३ ऑक्टोबर ला होणाऱ्या मतदानापूर्वी शेवटचे काही दिवस निवडणुकीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात कोण बाजी मारणार याकडे पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाचे लक्ष लागले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल, भाळवणीत आकाश कंदील कार्यशाळा उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, भाळवणी येथे कला महोत्सवांतर्गत आकाश कंदील तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तू आणि कागदाचा कल्पकतेने वापर करून तब्बल २७० आकर्षक आकाश कंदील तयार केले. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेतून साकारलेल्या या कंदिलांमुळे विद्यालयाचा परिसर दिवाळीच्या रंगात न्हाऊन निघाला.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि सणासुदीचा आनंद द्विगुणित व्हावा, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांची विभागणी करण्यात आली होती. दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध रंगसंगती आणि आकर्षक रचनांमधून सुंदर आकाश कंदील तयार केले. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून पर्यावरणपूरक सजावटीच्या वस्तू तयार करण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

**विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून साकारले २७० आकर्षक आकाश कंदील; पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश**

या कार्यशाळेसाठी कलाशिक्षक तुकाराम खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तयार करण्यात आलेल्या आकाश कंदिलांचे परीक्षण नागटिळक यू. व्ही., भोसले एम. के., नागणे एम. एस. आणि बनसोडे एम. एस. यांनी केले. प्रत्येक गटातून तीन क्रमांक निवडण्यात आले. या उपक्रमात शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर सेवकांनीही सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी सरपंच रणजित जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, प्रशांत माळवदे व विद्यालयाचे प्राचार्य के. डी. शिंदे, उपमुख्याध्यापिका पी. आर. मोरे आणि पर्यवेक्षक जी. पी. बेसिकराव यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याचे कौतुक केले.